दिनांक १ जुलै, २०१७ रोजी राज्यात किमान
४ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमात सहभागी
होण्यासाठी अधिकारी / कर्मचारी यांना
<u>कार्यालयीन वेळेत सवलत देणेबाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण- २०१७ / प्र. क्र. १०६ / १८ (र. व का.)**
मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २३ जून, २०१७

<u>वाचा :-</u> शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक : साववि - २०१६ / प्र. क्र. ८० / फ - ११, दिनांक १० ऑक्टोबर, २०१६.

<u>परिपत्रक :</u>

दिनांक १ जुलै, २०१७ ह्या एकाच दिवशी राज्यात किमान ४ कोटी वृक्ष लागवड करण्याच्या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे शासनाने निश्चित केले आहे. त्या दिवशी वन विभागामार्फत २.२५ कोटी वृक्ष लागवड केली जाणार आहे. तसेच शासनाच्या इतर २९ विभागांमार्फत ०.७५ कोटी आणि ग्रामपंचायतींकडून १.०० कोटी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे.

२. राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय संस्था / कार्यालये यामधील अधिकारी / कर्मचारी यांनी या कार्यक्रमात सक्रीय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

३. सदर वृक्षारोपण कार्यक्रम हा सकाळी ६ ते दुपारी १ वाजेपर्यंत सोयीच्या वेळेत व सोयीच्या ठिकाणी आयोजित करता येईल. वृक्षारोपण कार्यक्रमामध्ये सहभागी होणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै, २०१७ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत कार्यालयात उशीरा येण्यासाठी सवलत मंजूर करण्यात येत आहे.

४. वृक्षारोपण कार्यक्रमामध्ये स्वत: वृक्षारोपण करणे, स्वयंसेवक म्हणून वृक्षारोपण कामात भाग घेणे, लोकांना वृक्षारोपणासाठी उद्युक्त करणे, शासकीय यंत्रणांना वृक्षलागवडीच्या कामात जी मदत लागेल ती स्वत: पुढाकार घेऊन देणे, लोकसहभाग मिळविणे इत्यादी कामेदेखील करणे अपेक्षित आहे. सदर कार्यक्रम पार पाडल्यानंतर संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी लगेचच आपल्या कार्यालयात कर्तव्यावर रुजू होणे आवश्यक आहे. <u>**सदर सवलतीचा लाभ जे अधिकारी / कर्मचारी वृक्षारोपण करतानाचे छायाचित्र सादर करतील त्यांनाच अनुज्ञेय राहील, याची कृपया नोंद घ्यावी.**</u>

५. सर्व मंत्रालयीन विभागांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर सूचना त्यांचे नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांचे निदर्शनास आणाव्यात.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेताक २०१७०६२३१७५०४२१८०७ असा आहे. तसेच डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagwan Muralidhar Sahai

Digitally signed by Bhagwan Muralidhar Sahai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=57dd6ec1681532b63c78bdc2d0f79ab4b9efccc6814de3df1f59d557777b3c45, cn=Bhagwan Muralidhar Sahai
Date: 2017.06.23 17:48:56 +05'30'

**( डॉ. भगवान सहाय )**
**अपर मुख्य सचिव ( प्र. सु. र. व का. )**

**प्रति,**

१) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
३) मा. राज्यपालांचे सचिव ( ५ प्रती ),
४) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ( ५ प्रती ),
५) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
६) मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
७) मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
८) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
९) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१०) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
११) प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,
१२) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१४) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१५) मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१६) सर्व विभागीय आयुक्त,
१७) सर्व जिल्हाधिकारी,
१८) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१९) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख /
२०) प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
२२) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२३) निवड नस्ती ( कार्यासन १८ ).